# पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सासवड माळी शुगर फॅक्टरी लिमिटेड, माळीनगर, तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ४,५००.० टन/प्रतिदिन पासून ५,०००.० टन/प्रतिदिन पर्यंत, मळीवर आधारित आसावणी प्रकल्प क्षमता ३०.० किलोलिटर/दिन वरुन ५०.० किलोलिटर/दिन पर्यंत आणि सहवीज निर्मिती प्रकल्प क्षमता १४.८ मेगा वॅटवरुन १८.० मेगावॅट क्षमतेपर्यंत संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

**संदर्भः-**

**१)** भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार.

**२)** भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश.

**३)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश.

-------------

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सासवड माळी शुगर फॅक्टरी लिमिटेड, माळीनगर, तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ४,५००.० टन/प्रतिदिन पासून ५,०००.० टन/प्रतिदिन पर्यंत, मळीवर आधारित आसावणी प्रकल्प क्षमता ३०.० किलोलिटर/दिन वरुन ५०.० किलोलिटर/दिन पर्यंत आणि सहवीज निर्मिती प्रकल्प क्षमता १४.८ मेगा वॅटवरुन १८.० मेगावॅट क्षमतेपर्यंत संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी वार - शुक्रवार, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-०२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०११९-एफटीएस-०९३ दिनांक २०

जानेवारी, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

**२)** प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर - **आयोजक**

श्री प्रशांत भोसले, प्रभारी, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (संदर्भ क्रं. २ वरिलप्रमाणे) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (संदर्भ क्रं. ३ वरिलप्रमाणे) दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Virtual Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास उर्वरित व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व

उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री भोसले यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सासवड माळी शुगर फॅक्टरी लिमिटेड, माळीनगर, तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ४,५००.० टन/प्रतिदिन पासून ५,०००.० टन/प्रतिदिन पर्यंत,

मळीवर आधारित आसावणी प्रकल्प क्षमता ३०.० किलोलिटर/दिन वरुन ५०.० किलोलिटर/दिन पर्यंत आणि सहवीज निर्मिती प्रकल्प क्षमता १४.८ मेगा वॅटवरुन १८.० मेगावॅट क्षमतेपर्यंत संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग ब - ५ (जे), ५ (जी) व १ (ड) मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक २६-१०-२०२० रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती - Terms of Reference) देण्यात आली.

सदरहू जनसुनावणी ही आज दिनांक ०५-०२-२०२१ रोजी आयोजित करण्यास जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी मान्यता दिलेली आहे, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ व दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रात दिनांक

०५-०१-२०२१ रोजी मराठी व इंग्रजीत पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर, तहसीलदार, तहसील कार्यालय- माळशिरस, जिल्हा - सोलापूर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूर, ग्रामसेवक / सरपंच, ग्रामपंचायत, कार्यालय-, मौजे अकलुज, महाळुंग, यशवंतनगर, संग्रामनगर, सवतगाव, बागेचीवाडी, माळेवाडी, तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र

प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर, व मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. आयोजक यांनी असे सांगितले की स्थानिक मप्रनि मंडळ सोलापूर कार्यालयास काही लेखी आक्षेप व प्रकल्पास पाठिंबा असणारी लेखी निवेदने प्राप्त झालेली असून संबंधितांना सुनावणीच्या वेळी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री भोसले यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

श्री नितीन शिंदे, प्रभारी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समितीची ओळख उपस्थितांना करुन दिली. त्यांनी सांगितले की आज सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या विस्तारिकरणाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीसाठी जमलेलो आहोत. आपल्या ज्या पर्यावरणविषयक सूचना, नोंदी, आक्षेप आहेत, त्या आपण तोंडी वा लेखी मांडू शकतात.

सदस्य, पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू बैठक ही तीन स्तरात होईल. प्रथम प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार विस्तारिकरण प्रकल्पाचे सादरीकरण करतील. सदरहू विस्तारिकरणामुळे संभाव्य पर्यावरण आघातांवर पर्यावरण

उपाययोजनांची माहिती देतील. त्यानंतर दुस-या स्तरात उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना उपस्थित करण्यात येतील. याची नोंद बैठकीच्या इतिवृतात घेण्यात येणार आहे. त्यावेळेस आपण आपले नांव, गाव व प्रश्न मांडावेत. त्यांनी सांगितले की सदरहू समिती प्रकल्पाच्या मंजुरीबाबत कोणताही निर्णय घेत नाही. आपली भावना, प्रश्न, आक्षेप यांची नोंद घेण्यासाठी सदरहू समिती आहे. बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करुन प्राप्त झालेल्या सर्व लेकी आक्षेप व अंतिम पर्यावरणविषयक आघात मुल्याकन अहवालासोबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई येतील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा ८० वर्षांपूर्वी स्थापन झालेला प्रकल्प असून सदरहू प्रकल्प विस्तारीकरणास एकूण ३३.७५ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्प प्रवर्तकांनी सीईआर योजनांसाठी दरवर्षी ५0 लाख रुपये फंड म्हणून रोखून ठेवणार आहे.

सादरीकरणानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री महादेव नारायण बंडगर, राहणार-माजी उपसरपंच माळीनगर, विद्यमान ग्रामसभा सदस्य,ग्राहक संरक्षण कक्ष, उपजिल्हा प्रमुखः-**

ह्या प्रकल्पाचे पूर्णपणे विस्तारिकरण झाल्यानंतर सदरहू प्रकल्पात कोणकोणते उत्पादन किती प्रमाणात तयार होईल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की नावातच सर्व काही आहे. जर ५,००० मेट्रीक टन ऊस गाळप झाले, तर साधारणतः १०% उतारा धरला तर ५०० टन साखर, १८ मेगावॅट विद्युत निर्मिती आणि ५०,००० लिटर प्रतिदिन अल्कोहोल निर्मिती होईल.

२) **श्री गणेश मुरलीधर जगताप,सरपंच, ग्रामपंचायत, माळीनगर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर, वंचित बहुजन आघाडी प्रशासनः-**

या प्रकल्प विस्तारिकरणामुळे उत्पन्न होणारे सांडपाणी बाहेर पडेल काय? त्या सांडपाण्याची विल्हेवाट आपण कशी लावणार?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की साखर कारखान्यात ७० लिटर पाणी एक टन गाळपासाठी तयार होते, ते २००% खाली आहे. साखर कारखाना व सहविद्‌युत निर्मिती प्रकल्प हा एकत्रित असतो. प्रकल्पात उत्पन्न होणा-या संपुर्ण सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते व प्रक्रिया केलेले सांडपाणी हे आपण प्रकल्पातील हरित पट्‌टा संवर्धनासाठी वापरतो. प्रकल्पाच्या बाहेर सोडण्यात येत नाही. येथे साखर निर्मिती व सहविद्‌युत प्रकल्प हा एकच असतो. आसवणी प्रकल्प मात्र वेगळा असतो. आसवणी प्रकल्पात उत्पन्न् होणा-या सांडपाण्याचे/स्पेंट वॉशचे पावडरमध्ये रुपांतर करुन त्याचा खत म्हणून वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

३) <u>श्री संग्राम दत्तात्रय भोसले, माळीनगर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-</u>

प्रकल्प विस्तारिकरणासाठी नविन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे होणा-या प्रदूषण नियंत्रणासाठी काय उपाययोजना किंवा कुठल्या सयंत्रणा बॉयलरला बसविण्यात येईल?

प्रकल्पात ९०.० टनाचा बॉयलर कार्यान्वित असून त्यास इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर (Electro Static Preceptor) सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यास ७२ मीटर्सची चिमणी

आहे. विस्तारिकरणात २२.० टनाचा एक नविन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार असून त्यालाही इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर (Electro Static Preceptor) सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर (Electro Static Preceptor) सयंत्रणा ही हवा प्रदूषण नियंत्रणात अत्यंत आधुनिक सयंत्रणा असून ती ९९.९% कार्यक्षमता देते. त्यास चिमणी बसविण्यात येईल. नविन चिमणी ही ६० मीटर्स उंचीची असेल.

४) **<u>श्री नागेश संपत तुपसौंदर्य, उपसरपंच, माळीनगर ग्रामपंचायत, राहणार-माळीनगर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर:-</u>**

विस्तारिकरणानंतर प्रकल्प किती दिवस चालू राहिल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की साखर कारखाना ऊस संपेपर्यंत चालू असतो. अंदाजे १६०-१८० दिवस साखर कारखाना चालेल. मात्र आसवणी प्रकल्प हा ३३० दिवस कार्यान्वित ठेवता येईल. आसवणी प्रकल्पातील सांडपाण्याचे आपण पावडरमध्ये रुपांतर करणार आहोत. आता आसवणी प्रकल्पास जास्त फायदा आहे.

५) **श्री प्रकाश तुकाराम कांबळे, अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.पी.आय), माळीनगर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

प्रकल्प विस्तारिकरणासाठी रोज किती लिटर पाणी लागेल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की दोन्ही प्रकल्पाची म्हणजे साखर व सहविद्युत प्रकल्प व आसवणी याची माहिती वेगळी देण्यात येत आहे. त्यांनी सांगितले की साखर व सहविद्युत प्रकल्प विस्तारिकरणासाठी २३६१ घनमीटर म्हणजे २४०० घनमीटर पाण्याची गरज भासेल. त्यातील जवळजवळ २३०० घनमीटर पाणी हे ऊसापासून निर्माण होणारे पाणी प्रक्रिया करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर प्रकल्पात करण्यात येणार आहे. म्हणजे आपण ९७% ऊसातील पाणी उत्पादन प्रक्रियेत परत वापरणार आहोत. फक्त ३% शुध्द पाणी म्हणजे फक्त ६२,००० हजार लिटर पाणी नदीतून आपणास लागणार आहे.

त्याचप्रमाणे आसवणी प्रकल्पातही सांडपाण्यातील (स्पेंट वॉशमधील) पाणी हे काढून त्यावर प्रक्रिया करुन पुनर्वापर करण्यात येणार आहे. तेथेही अगदी कमी म्हणजे ८० घनमीटर पाणी लागणार आहे.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे पर्यावरण सल्लागार यांना सूचना केली की

उपस्थितांमध्ये अशी शंका दिसत आहे की कार्यरत आसवणी प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाणी आपण कंपोस्ट करत आहात तर भविष्यात उत्पन्न होणा-या सांडपाण्याचे आपण पावडरमध्ये रुपांतर करणार आहात. तर आपण भविष्यतील एकत्रित सांडपाण्यावर आपण कंपोस्टींग करणार आहात काय वा सर्व सांडपाण्याचे पावडरमध्ये रुपांतर करणार आहात काय याबाबत ऊहापोह करण्यात यावा.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की भविष्याचा विचार करुनच पुढील धोरण ठरविण्यात आलेले आहे. ५० केएलपीडीचा आसवणी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर आपण संपूर्णपणे कंपोस्टींग थांबविणार असून आसवणी प्रकल्पातील सर्व सांडपाण्याचे (स्पेंट वॉशचे) आपण पावडरमध्ये रुपांतर करणार आहोत. त्यामुळे जुन्या प्रकल्पातील अडचणीसुध्दा नष्ट होतील व आपणास शुध्द पाणीसुध्दा कमी लागेल, कारण पावडरमुळे पाण्याची पुनर्प्राप्ती (recovery) ही जास्त होईल.

६) **<u>श्री धीरज दत्तात्रय जाधव, गट नं.२,महाळुंग, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रकल्पात साखर कारखाना, सहविद्‌युत प्रकल्प व आसवणी प्रकल्प यांचे विस्तारिकरण करण्यात येणार आहे. तर प्रकल्पातील सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेचेही (Effluent Treatment Plant) विस्तारिकरण करण्यात येणार आहे काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की साखर कारखाना व सहविद्युत प्रकल्प व आसवणी असे दोन वेगवेगळे प्रकल्प आहेत. त्यातील साखर कारखाना व सहविद्युत प्रकल्पातील सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेचेही (Effluent Treatment Plant) विस्तारिकरण करण्यात येणार आहे. आसवणी प्रकल्पातील कंपोस्टींग हा एक प्रकारचा सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा (Effluent Treatment Plant) आहे. तो संपूर्णपणे बंद होणार असून भविष्यात सर्व आसवणी सांडपाण्याचे (स्पेंट वॉश) पावडरमध्ये रुपांतर हे इन्सिनरेशनव्दारे करणार आहे. त्यास ३० कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे.

**<u>यावेळी श्री धीरज दत्तात्रय जाधव यांनी</u>** प्रश्न विचारला की साधारणतः किती क्षमतेने सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा (Effluent Treatment Plant) विस्तारिकरण करणार आहात? त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ३१३ घनमीटर सांडपाणी तयार होते व भविष्यात ३५० घनमीटर म्हणजे फक्त ३७ घनमीटर सांडपाणी वाढणार आहे. जरी कार्यरत सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा (Effluent Treatment Plant) हा सक्षम आहे, तरी सांडपाण्यामध्ये गुणवत्तेमध्ये सुधारणा होण्यासाठी आधुनिक सयंत्रणा (Modern Devices) बसविण्यात येणार आहेत.

**श्री धीरज दत्तात्रय जाधव यांनी** आक्षेप नोंदविला की माझी कारखान्याजवळ शेती आहे. प्रकल्पातील राख/फ्लाय एश ही आमच्या शेतातील पीकांवर, पाण्यावर पडते. मोकळ्या जागेतही पडलेली असते. जनावरांना टाकण्यात येणा-या चा-यावरही पडलेली असते. लहान मुले खेळताना त्यांच्या हाताला पण लागते, त्यामुळे ती पोटात पण जाते.

यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत श्री जाधव यांना सांगितले की आपण नोंदविलेल्या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे.

७) **श्री अमर नझर काझी, राहणार-सवतगाव, तालुका- , जिल्हा-सोलापूरः-**

प्रकल्पात ईएसपी सयंत्रणा बसविण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रकल्पातून एकही कण राख बाहेर पडत नाही. मी कारखान्याच्या पलिकडेच राहतो. शेतकरी ऊसाचा फड रोज जाळतात. त्यापासून निघणारी राख आहे, ती काहीजणांच्या जनावरांच्या गोठ्यात जाते, काहींच्या घरात जाते. मात्र कारखान्यातून निघणारी राख ही कोणाच्याही घरात जात नाही. तरी कारखान्यातून निघणा-या राखेवर आमचा काहीही आक्षेप नाही.

यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे उपस्थितांना सांगितले की कारखाना किती चांगले काम करतो यासाठी जनसुनावणी नाही. ही बैठक विस्तारिकरणामुळे पर्यावरणावर होणारे संभाव्य आघात व त्यावर उपाययोजना यावर पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी आहे. त्याअनुषंगानेच प्रश्न मांडावेत.

८) **श्री अरुण निवृत्ती मदने, शहर प्रमुख, माळीनगर शिवसेना, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

एका लिटर अल्कोहोलला किती लिटर पाणी लागेल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की एक लिटर अल्कोहोल तयार करण्यास दहा लिटर ताजे पाणी वापरण्यास शासनाची परवानगी आहे. आपण एक लिटर अल्कोहोलासाठी दीड लिटर शुध्द पाणी वापरणार आहोत. म्हणजे आपण ८५% कमी शुध्द पाणी वापरणार आहोत.

त्यावेळी श्री मदने यांनी मत मांडले की याचा अर्थ प्रदूषणाचा कोणताही धोका नाही. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की स्पेंट वॉशचे आपण पावडरमध्ये रुपांतर करणार आहोत आणि असे प्रकल्प इतर ठिकाणी कार्यरत आहेत. यावेळी श्री मदने यांनी येथे अभिप्राय दिला की आम्ही येथील परिसरात फिरतो, कोणी काहीही सांगो, आम्हांला कोठेही प्रदूषण आढळत नाही.

**९) श्री संजय महिपती दळवी, अध्यक्ष, कॉंग्रेस माळशिरस शहरः-**

या प्रकल्पामुळे आजूबाजूच्या गावांना कोणाता फायदा होणार आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की विस्तारिकरणामुळे उत्पादन वाढेल. त्यामुळे प्रकल्पाची आर्थिक प्रगती होईल. प्रकल्पात रोजगाराची संधि उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड वाढ होईल. त्यामुळे परिसरातील लोकांचा निश्चितच फायदा होईल.

**१०) श्री शिवकांत कनगची, राहणार-माळीनगर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

या प्रकल्पात उत्पन्न होणा-या कच-यावर काय उपाययोजना करण्यात येणार आहेत?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात उत्पन्न होणा-या द्रवरुपी सांडपाण्यावर काय प्रक्रिया करण्यात येणार आहे त्याचे सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. घनकच-यामध्ये प्रकल्पात बॉयलरमधून होणारी राख ही परिसरातील शेतक-यांना खत म्हणून उपलब्ध करुन देण्यात येईल. यीस्ट स्लज हा जाळण्यात येणार असून त्याची राख होणार आहे. सर्व विभागातील राखेची विल्हेवाट ही शास्त्रीयदृष्ट्या लावण्यात येईल.

११) **<u>श्री नाना साळुंखे, राहणार -माळीनगर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात हरितपट्टा विकासासाठी काय उपाययोजना केलेल्या आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की जरी नियमानुसार ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक आहे तरीही कार्यरत प्रकल्पातच आपण ४०% हरितपट्टा विकसित केलेला आहे. ह्यात आपण स्थानिक झाडे व फळझाडे लावलेली असून भविष्यात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रकल्पाची गरज असल्याने जवळजवळ अतिरिक्त ५% झाडे अजून लावण्यात येतील.

१२) **<u>श्री रमझान कासिम इनामदार, राहणार -माळीनगर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास किती खर्च येईल?

सदरहू विस्तारीकरणास ३३ ते ३५ कोटी रुपये खर्च होईल.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही प्रश्न, सूचना वा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे बैठकीच्या स्थानाच्या बाहेर काही व्यक्ती थांबल्या आहेत काय याबाबत विचारणा केली. तेथे कोणी बैठकीसाठी आले असतील पुढील सत्रात त्यांना संधि देण्यात येईल. त्यांनी तेथील प्रकल्प

अधिका-यांना याबाबत सभास्थानी बाहेर कोणी असल्यास चौकशी करण्याची सूचना केली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सोलापूर व पुणे कार्यालयात सदरहू जनसुनावणी संदर्भात काही सूचना, आक्षेप प्राप्त झालेले आहेत, त्यात श्री विराज प्रकाश निंबाळकर यांच्या दोन तक्रारी, त्याचप्रमाणे श्री नीतीन राबसाहेब निंबाळकर यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रकल्प विस्तारीकरणास परवानगी देण्यास काही जणांनी सूचना केलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे म.प्र.नि. मंडळ पुणे कार्यालयासही प्रकल्प विस्तारिकरणाच्याविरुध्द काही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. एक तक्रार प्राप्त झालेली होती, पण ती परत मागे घेण्यात आली. या सर्व तक्रारी उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांना वर्ग करण्यात आलेल्या असून सदरहू तक्रारी, विस्तारिकरणास पाठिंबा देणारी पत्रे बैठकीचे इतिवृत्त व अंतिम पर्यावरण अहवालासोबत अध्यक्षांच्या सहीने शासनास सादर करण्यात येतील. त्याबाबत पुढील निर्णय शासन घेईल. बैठकीचे इतिवृत्त अध्यक्षांनी मंजूर केल्यानंतर मप्रनि मंडळाच्या वेबसाईटवरही उपलब्ध असेल. त्यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. त्यांनी अध्यक्ष,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ते दोन-तीन सूचना देत आहेत. त्यांनी पर्यावरण सल्लागार यांना सूचना केली की विस्तारिकरणाबाबत जे काही आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत, त्यावर आपण भाष्य करणे अपेक्षित आहे. तरी आपण आपले भाष्य म.प्र.नि मंडळ कार्यालयास सादर करावेत. ते शासनास इतिवृत्त व अंतिम पर्यावरण अहवालासोबत सादर करण्यात येईल.

त्यांनी सूचना केली की सादरीकरणात दर्शविलेली रोजगारनिर्मिती संख्या तपासून पहावी. कारण फक्त २५ व्यक्तींना रोजगाराची संधि मिळेल हे योग्य वाटत नाही, कारण सदरहू प्रकल्प हा मोठा आहे. कदाचित प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात पूर्णपणे आधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करणार असल्याने ती कमी असू शकते असे मत मांडले. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांना उत्तर दिले की आम्ही प्रकल्पातील प्रत्यक्ष रोजगाराची संधिबाबतच उल्लेख सादरीकरणात करत असोत. मात्र परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात भरपूरच वाढ होऊन कित्येक हजारो लोकांना नोकरीची संधी मिळण्याचा फायदा होईल. अध्यक्षांनी याबाबत पुनर्विलोकन करुन अहवालात नोंद घेण्याची सूचना केली.

अध्यक्षांनी सूचना केली की पाण्याच्या पुनर्वापराबाबत उपस्थितांची काही तक्रारी, शंका उपस्थित केलेल्या आहेत. त्याबाबत स्पष्टीकरण करण्यात यावे त्याचप्रमाणे, परिसरातील पशूपक्षांचा जरी सर्वेषण केलेले असले, तरी फुफ्फुसांच्या रोगांबाबतही सर्वेषण करण्यात यावे, कारण १-२ दोघेजण त्याबाबतीत आक्षेप नोंदवित होते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे काही प्रश्न नसल्याचे दिसत असून पुढील कार्यवाहीची सूचना केली.

१३) **यावेळी वाय.चंद्रशेखर रेड्डी, सामाजिक कार्यकर्ता, तेलंगणा राज्य** यांनी सूचना देताना सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर प्रकल्पाचे विस्तारिकरण होणे गरजेचे आहे. त्यांनी प्रकल्पातील घरगुती सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा (Sewage Treatment Plant-STP) आणि औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा (Effluent Treatment Plant-ETP) योग्य प्रकारे चालविल्यास काहीही अडचण येणार नाही असे सांगितले. त्यांनी दोन्ही सयंत्रणा पूर्णवेळ कार्यान्वित करण्याची सूचना केली. कोविडच्या पार्श्वभूमीवर दारिद्र्ये रेषेखालील व्यक्तींना मदत करण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे कोविडमुळे प्रभावित झालेल्या जनतेस सीएसआर निधीतून मदत करण्याची सूचना केली. त्यांनी विस्तारिकरणाची प्रगतीसाठी गरज असल्याने

विस्तारिकरणास परवानगी देण्याची सूचना केली. त्यांनी त्यांचे निवेदन लेखी स्वरुपातही सादर केले.

येथे **श्री धीरज दत्तात्रय जाधव यांनी** त्यांना नोंदविलेल्या आक्षेपांबाबत पुढील कार्यवाहीची सूचना केली.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या तक्रारी, सूचना यांची इतिवृतात नोंद घेण्यात आलेली असून स्थानिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, सोलापूर ह्यास आपण नोंदविलेल्या तक्रारीचा शहानिशा करुन अहवाल सादर करण्याची सूचना करण्यात येईल असे सांगितले.

उपस्थितांकडूना कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी उपस्थितांना आता कोणतेही प्रश्न विचारायचे नाही असे दिसून येते असे मत मांडले. त्यांनी उपस्थितांचे प्रकल्पाबाबत विचारलेले प्रश्नांबाबत आभार मानले. त्यांनी प्रकल्प सल्लागार यांनी सादरीकरण चांगले केल्याबद्दल त्यांचे आभार मानले त्याचप्रमाणे प्रकल्प अधिकारी यांनी कोविडच्या पार्श्वभूमीवर बैठकीचे योग्य आयोजन केल्याबद्दल त्यांचे आभार मानले व अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न् झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून सभा संस्थिगत करण्यात आली.

सोबत ०२ आक्षेप, ११ पाठिंबा तसेच ०२ सूचना प्राप्त झालेले असून त्याची नोंद घेण्याची सूचना केली.

(श्री. प्रशांत भोसले),
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी, उप प्रादेशिक
अधिकारी,
मप्रनि मंडळ, सोलापूर

(श्री. नितीन शिंदे) ,
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे

(श्री. भारत वाघमारे),
अध्यक्ष
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सोलापूर
जिल्हा- सोलापूर